# मेट्रो-३चे ७० टक्के भुयारीकरण पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारा राबविल्या जाणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रोमार्ग ३चे ७० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. एकूण ५५ किमी भुयारीकरणापैकी ३८.२५ किमीचे भुयारीकरण पूर्ण झाले असून मेट्रो ३ प्रकल्पाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा आहे. भूमिगत असलेल्या या प्रकल्पाचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे.

'७० टक्के भुयारीकरण होणे म्हणजे या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे,' अशी प्रतिक्रिया मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली. मेट्रो ३चे संपूर्ण भुयारीकरण ३२ टप्प्यांत पूर्ण होणार असून आतापर्यंत २३ टप्पे पूर्ण झाले आहे. या मेट्रोने दररोज १७ लाख प्रवासी प्रवास करतील ज्यामुळे रोजच्या



६.५ लाख वाहनफेऱ्या कमी होऊन प्रदूषित वायूंचे प्रमाण प्रतिवर्षी २.६१ लाख मेट्रिक टनने कमी होईल.

आतापर्यंतचा भुयारीकरणाचा विचार करता ७वा टप्पा (मरोळ नाका ते आरे स्थानक) आघाडीवर असून या टप्प्यामध्ये ९७ टक्के बोगदा खणूण झाला आहे. १२ डिसेंबर २०१९ पर्यंत येथील १०० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

## भुयारीकरणाच्या प्रगतीचा तपशील

- टप्पा, मार्ग, भुयारीकरणाची टक्केवारी
- १ कफ परेड ते हुतात्मा चौक स्थानक ५८ टक्के
- २ सी एस टी ते ग्रँट रोड स्थानक ८६ टक्के
- ३ मुंबई सेंटर ते वरळी स्थानक ३८ टक्के
- ४ सिद्धिविनायक ते शितालादेवी मंदिर स्थानक ७४ टक्के
- ५ धारावी ते सांताक्रुझ स्थानक ७४ टक्के
- ६ आंतरदेशीय विमानतळ ते आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानक ६० टक्के
- ७ मरोळ नाका ते आरे स्थानक ९७ टक्के